Late Ramesh Warpudkar ACS College ★ Ta.Sonpeth Dist.Parbhani ★ Sonpeth Pin-431516

# Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist Parbhani

## Cultural Department

## Women Empowerment Lecture Series.

## 3 January to 12 January 2022

**Lectures by various experts on women empowerment through Facebook Live were organized through Facebook Live.**

The objective of the program is to train women in law by providing them with available opportunities and knowledge of the Constitution. To create awareness among women about unjust oppression of women. Achieving Gender equality. To create a sense of self-esteem in women.

**Professor Dr. Vedashree Thigale Nashik Professor Dr. Saili Samudre Latur Dr. Madhavi Nikam. Inaugural Honorable Parameshwar Kadam Saheb Principal Dr. Vasant Satpute**

The lecture series was organized on the Facebook page of the college.

**Brief description of the program:** This virtual event is organized on the Facebook page of Warpudkar College. The lectures of the popular thinkers on women studies were organized during 3rd January to 12th January 2022. In this program, Dr. Vedashree Thigale presented her thoughts on the topic of strong women, strong society, and Dr. Saili Maiti gave her views on why there is a need for women's empowerment. Dr. Madhavi Nikam presented her thoughts on the status and reality of women empowerment. Through this program women were made aware of their rights and laws.

**EFFECTIVENESS OF THE PROGRAM**: The need to empower women by making them aware of their rights and entitlements was highlighted. It helped to empower women by instilling positive attitudes in women through the Women Empowerment Lecture Series to increase self-reliance and self-confidence. The government's policy on women empowerment and the reality of women empowerment were discussed in this lecture.

**Participation:**

A total of 208 persons including 120 students and 88 employees participated in this.

1) प्रा. डॉ. संतोष रणखांब
2) प्रा. डॉ. वनिता कुलकर्णी
3) प्रा. डॉ. सुनिता टेंगसे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ संचालित
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड संलग्नित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि. परभणी.

## सांस्कृतिक विभाग

**भारतीय स्वतंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्याने**

**आयोजित लाईव्ह व्याख्यानमाला**

महिला सबलीकरणाला बळ देण्याच्या हेतुने दि.०३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२२ दरम्यान महिला व्याख्यात्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.





| दिनांक /वेळ | साधन व्यक्ती | | विषय |
|---|---|---|---|
| ०३ जानेवारी २०२२ सांयकाळी ०४:०० वाजता | **प्रा.डॉ. वेदश्री थिगळे** मराठी विभाग प्रमुख , के.एस डब्लयू कॉलेज, सिडको,नाशिक |  | सशक्त महिला सशक्त समाज |
| ०९ जानेवारी २०२२ दुपारी ०१:०० वाजता | **प्रा.डॉ.सायली समुद्रे** समाजशास्त्र विभाग प्रमुख , राजश्री शाहु महाविद्यालय , (स्वायत्त)लातुर. |  | महिला सबलीकरणाची आवश्यकता |
| १२ जानेवारी २०२२ दुपारी ०१:०० वाजता | **डॉ.माधवी निकम** इंग्रजी विभाग , आर.के.तलरेजा कॉलेज, उल्हासनगर, ठाणे, मुंबई. |  | महिला सबलीकरण स्थीती आणि वास्तव |

**अध्यक्ष**
मा. परमेश्वरराव कदम

**उपाध्यक्षा**
सौ.ज्योतीताई कदम

**प्राचार्य**
डॉ.वसंत सातपुते

**सांस्कृतीक विभाग**

प्रा.डॉ. संतोष रणखांब
प्रा.डॉ.वनिता कुलकर्णी
प्रा.डॉ. सुनिता टेंगसे

Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता आहे.-डॉ. वेदश्री थिगळे



सोनपेठ (दर्शन) :- महिला सक्षमीकरणाला बळ देण्याच्या उद्देशाने ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२२ या दरम्यान स्त्री व्याख्यात्यांच्या व्याख्यानाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. कै रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या फेसबुक पेज वरून हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असणार आहे.

व्याख्यानाच्या पहिल्या दिवशी दिनांक ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त डॉ. वेदश्री थिगळे, मराठी विभाग प्रमुख, के. एस. डब्लू. कॉलेज, नाशिक यांचे 'सशक्त महिला सशक्त समाज' हे व्याख्यान महाविद्यालयाच्या फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून संपन्न झाले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या 'स्त्रियांना नेमकं काय हवं असतं या प्रश्नाचे एकमेव उत्तर म्हणजे स्वातंत्र्य होय. आणि हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी स्त्रियांना फार मोठा संघर्ष करावा लागला. १९७५ नंतर स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले गेले. त्यावर विविध स्वरूपाच्या चर्चा घडवून आणल्या. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळावा यासाठी मोठा लढा द्यावा लागला. त्यांच्या विकासासाठी विविध योजना, विविध कायदे, विविध कार्यक्रमांची आखणी केली असली तरीही आजही स्त्रियांना किती प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले आहे ? याचे प्रमाण आपण नक्की उत्तर सांगू शकत नाहीत. तरीही, आज एकविसाव्या शतकात स्त्रियांचा समाजामध्ये असणाऱ्या दर्जा हा बदलतो आहे. शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया विविध क्षेत्रात आपले कार्यकर्तृत्व दाखवत आहेत. याचा उपयोग तिच्या स्व विकासासाठी, कुटुंबासाठी व राष्ट्र विकासासाठी होत आहे. कुटुंबापासून ते संसदेपर्यंतच्या स्त्रियांच्या प्रवासाची उकल त्यांनी केली. १९ व्या शतकापासून ते २१व्या शतकापर्यंत स्त्रियांमधील स्थित्यंतराची मांडणी त्यांनी आपल्या व्याख्यानात केली.'

या व्याख्यानासाठी मा.संस्थाध्यक्ष परमेश्वर कदम, मा.उपाध्यक्ष ज्योतीताई कदम,आदरणीय प्राचार्य डॉ. वसंत सातपुते यांनी सहभागी घेतला. तसेच मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक यांनीही या फेसबुक लाईव्ह व्याख्यानाचा लाभ घेतला.

Scanned with OKEN Scanner

मराठी

# आत्मविश्वास महिलांना सक्षम बनवतो : प्रा. सायली समुद्रे

प्रतिनिधी | सोनपेठ

महिला जेव्हा सक्षम होतात तेव्हा त्याचा फायदा हा फक्त महिलांनाच होतो असे नाही तर सक्षम महिलांचा फायदा हा कुटुंब, समाज आणि राष्ट्र याला बळकटी देण्यासाठी होत असतो. आत्मविश्वास हा घटक महिलांना यशस्वी बनवतो, असे प्रतिपादन प्रा.सायली समुद्रेंनी केले.

येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत महिला सक्षमीकरण समितीच्या वतीने आयोजित 'महिला व्याख्यानमाले'त सोमवारी (ता.१० जानेवारी) राजर्षि शाहु महाविद्यालय, लातूर येथील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. सायली समुद्रे यांनी महिला सक्षमीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, आज एकविसाव्या शतकात महिलांची जी बदलती स्थिती आहे ती सहजासहजी तयार झालेली नसून त्यासाठी एकोणिसाव्या शतकात स्त्रीविषयक असणाऱ्या चळवळींची मोठे योगदान मिळालेले होते. विविध समाजसुधारकांनी यासाठी

## कुटुंबीयांनी पाठबळ दिले तर यशाकडे वाटचाल

आज विविध क्षेत्रात महिला यशस्वीपणे कामगिरी करत आहेत. प्रत्येक घरातील सदस्यांनी महिलांना सुप्त कलागुणांची, कौशल्यांची, जाणीव करून देत पाठबळ दिल्यास महिलांची नक्कीच यशाकडे वाटचाल होईल, असेही प्रा.समुद्रे यांनी सांगितले.

आंबेडकरांनी महिलांच्या हित व हक्कांच्या संदर्भात विचार मांडले. जे भविष्याचा वेध घेणारे ठरले. महामानवांनी समाजातील कुप्रथांवर घाला घातला. महिलांना समाजात माणूस म्हणून वागवले जावे, त्यांना मानसन्मान मिळावा व स्त्रियांना त्यांचे हक्क आणि अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी समाज प्रबोधना बरोबरच विविध कायद्यांची निर्मिती केली. महामानवांच्या प्रयत्नातून स्त्रियांची समाजातील दुय्यमत्वाची स्थिती बदलण्यास निश्चितच मदत झाली, असे त्या म्हणाल्या. या व्याख्यानासाठी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष परमेश्वर कदम, उपाध्यक्षा

Late Ra... ACS College Sonpeth Pin-431516 Ta... Dist.Parbhani

Scanned with OKEN Scanner